राज्यातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या भूसंपादनाबाबतच्या कामांचे संनियंत्रण करण्यासाठी समन्वय समिती गठित करणे.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-२०१५/सं.क्र.१२५४/अ-३**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ८ डिसेंबर, २०१५.

**प्रस्तावना :-**

राज्यातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नागपूर तसेच नाशिक,रायगड, अहमदनगर,पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव या जिल्हयांमध्ये महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प आहेत. या प्रकल्पांचा मा.मुख्यमंत्री महोदयांच्या 'वॉर रुम' मध्ये समावेश असतो. तसेच या प्रकल्पांबाबत मा.केंद्रीय मंत्री महोदयांकडून पाठपुरावा करण्यात येतो.

स्थानिक पातळीवरील भूसंपादनविषयक प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती गठित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत शासनाने सर्वंकष विचार करून औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नागपूर तसेच नाशिक,रायगड, अहमदनगर,पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव या जिल्हयांतील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांस लागणाऱ्या खाजगी जमिनींच्या भूसंपादनाच्या कामाबाबत समन्वय साधून भूसंपादन जलद गतीने पूर्ण करून घेण्यासाठी समन्वय समिती गठित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नागपूर तसेच नाशिक,रायगड, अहमदनगर,पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव या जिल्हयांतील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या भूसंपादनाचे काम विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्यासाठी स्थानिक पातळीवरील बाबींचे संनियंत्रण करून तातडीने निर्णय घेण्याकरिता जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नागपूर तसेच नाशिक,रायगड, अहमदनगर,पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कार्यक्षेत्रातील भूसंपादनाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे समन्वय समिती गठित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | संबंधित जिल्हयाचे सक्षम प्राधिकारी, भूसंपादन (CALA) | सदस्य सचिव |
| ३ | संबंधित जिल्हयाचे उपविभागीय अधिकारी | सदस्य |
| ४ | भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे संबंधित प्रकल्प संचालक | सदस्य |

**समितीची कार्यकक्षा :-**

१) जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या भूसंपादनाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी संयुक्त मोजणी त्वरेने पूर्ण करून निवाडा जाहीर करणे, मोबदल्याचे वाटप, संपादक संस्थेस ताबा देणे यांबाबतचा कालबद्ध कार्यक्रम तयार करून त्वरेने कार्यवाही करणे .

२) भूसंपादन कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना आखणे.

उपरोक्त समितीने प्रत्येक महिन्यात किमान एकदा व आवश्यकता भासल्यास जास्त वेळा बैठक घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५१२०८१२५२४०४६१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashok Ramchandra Redekar

Digitally signed by Ashok Ramchandra Redekar
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ashok Ramchandra Redekar
Date: 2015.12.08 12:54:17 +05'30'

(अ. रा. रेडेकर)
कार्यासन अधिकारी

**प्रति,**

१. मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
२. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. विभागीय आयुक्त, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर.
४. जिल्हाधिकारी , औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नागपूर तसेच नाशिक,रायगड, अहमदनगर,पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव
५. उपसचिव (भूसंपादन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. सक्षम प्राधिकारी, भूसंपादन (CALA), औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नागपूर तसेच नाशिक,रायगड, अहमदनगर,पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव
७. उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नागपूर तसेच नाशिक,रायगड, अहमदनगर,पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव.
८. प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नागपूर तसेच नाशिक,रायगड, अहमदनगर,पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव
९. कक्ष अधिकारी (अ-१), महसूल व वन विभाग.
१०.निवड नस्ती(अ-३).